दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १५२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

९ सप्टेंबरपासून पनवेल तालुक्यातील रेशनिंग दुकानदार धान्य उचल व वितरण करणार बंद

ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर्स संघटना फेडरेशन पुणे यांच्या आंदोलनाला पूर्ण पाठींबा

दै.रायगड नगरी । पनवेल

ई पॉज मशिनद्वारे धान्य वितरण करण्यास स्थगितीबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने आदेश दिले आहेत. त्याला चार आठवडे झाले मात्र त्यावर सरकारचा अद्याप निर्णय झालेला नाही. कोरोना महामारीत रेशनिंग दुकानदार अविरतपणे सेवा देत आहेत. परंतु शासनाला याची जाणीव नाही. त्यामुळे १ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या राज्यव्यापी आंदोलनाला रास्त भाव दुकान वेल्फेअर असोसिएशन पनवेल यांचा पूर्ण पाठींबा असून १ सप्टेंबरपासून पनवेल तालुक्यातील रेशनिंग दुकानदार धान्य उचल व वितरण बंद करणार आहेत, असे संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हा प्रशासनाला कळविले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना कार्डधारकांचे अंगठ्यांचे ठसे घेवून ई पॉज मशिनवर धान्य वितरण करण्यासाठी दुकानदारांना सक्ती करण्यात येत असून दुकानदारांचा ग्राहकांचे अंगठे घेण्याला सक्त विरोध आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात कोरोना महामारी संक्रमण वाढत असून रुग्णांची संख्या १० हजाराहून अधिक असून दिवसेंदिवस कोरोना

रुग्णांची संख्या वाढतच आहे. यामध्ये पनवेल तालुक्यातील दुकानदार देखील कोरोना संक्रमीत असून दुकानदारांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. देशात व राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार १७ मार्च पासून सर्व शासकीय, निमशासकीय तसेच दुकानात ई-पॉज बायामेट्रीक थंबस्च्या वापरावर मनाई करण्यात आली होती. परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना ई-पॉज मशिनवर अंगठे घेण्याची सक्ती करण्यात येत आहे. याबद्दल दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच पंतप्रधान गरीब कल्याण योजनेंतर्गत धान्य वाटप केलेल्या वितरणाचे कमिशन देखील अद्याप पर्यंत दिले गेलेले नाही. ते कमिशन त्वरित रेशनिंग दुकानदारांना अदा करावे. तसेच रेशनिंग दुकानदार कोरोना बाधीत होत आहेत, मृत्यूमुखी पडत आहेत. त्यांचा संसार उघड्यावर येत आहे. याचा शासनाने गांभीर्यपूर्वक विचार करावा अशी मागणी निवेदनातून केली आहे.

महाड इमारत दुर्घटना १२ मृतदेह बाहेर काढले

१९ तासानंतर चिमुकला मोहम्मद ढिगाऱ्याखालून सुखरुप बाहेर

१ बालक बचावला, १३ जणांना ढिगाऱ्याखालून काढण्यात एनडीआरएफच्या दलाला यश : पाचजणा विरोधांत गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । महाड

सोमवारी सांयकाळी रायगड जिल्हातील महाड शहरामधील काजळपूरा खारकांड मोहल्ला येथील एक पाच मजली तारीक गार्डन नावाची इमारत पत्त्यासारखी कोसळून फार मोठी दुर्घटना घडली होती यामध्ये तात्काळ सुरु करण्यात आलेल्या बचाव कार्यातील एन.डी आर.एफ.च्या जवानांना मोठ यश आल असून आता पर्यंत मृतदेह या कोसळलेल्या मलम्यातून काढण्यात आले आहेत तर एक ४ वर्षाच बालक कही सुदैवरित्या बाल – बाल बचावल आहे त्यालाही जिवंत बाहेर काढण्यात आले आहे.

सोमवारी सायंकाळी झालेल्या घटनेनंतर स्थानिक कार्यकर्त्यांनी तातडीने बचाव कार्य सुरू केले होते. यामध्ये आठ ते दहा जणांना वाचवण्यात यश आले. दरम्यान रात्री उशिरा पुणे येथून आलेल्या एनडीआरएफच्या पथकाला लार्सेन टुब्रो कंपनीच्या यंत्रणेकडून तसेच स्थानिक कार्यकर्त्यांकडून झालेल्या मदतीमुळे काही जणांचे जीव वाचवण्यात यश आले आहे. मंगळवारी दुपारी चार वर्षांच्या बालकाला वाचविल्यानंतर अनेकांना अजूनही काही जिवंत नागरिक बाहेर येऊ शकतील असा विश्वास वाटू लागला आहे. मंगळवारी पहाटे २ वाजल्यापासून एनडीआरएफचे बचाव दल श्वानपथकासह कार्यरत झाले. महाडमधील अनेक संस्थांचे कार्यकर्ते नागरिक बचाव कार्यामध्ये अहोरात्र मदत करीत आहेत. तारीक गार्डन इमारत कोसळल्यानंतर ढिगाऱ्याखाली अडकलेल्या अठरा जणांचा मृत्यूशी संघर्ष सुरु आहे. गेल्या अठरा तासांपासून एनडीआरएफच्या पथकासह लार्सेन टुब्रो कंपनीचे कामगार व स्थानिक कार्यकर्त्यांकडून अथक प्रयत्न सुरूच

इमारतीच्या ढिगाऱ्याखाली १३ लोक अडकले आहेत. या दरम्यान आज, मंगळवारी (दि. २५) सकाळपासून दोन मृतदेह हाती लागले आहेत. तसेच ४ वर्षांच्या बालकास सुखरूप जिवंतपणे बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. या मुलाला सुखरुपपणे बाहेर काढल्यानंतर उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा गजर करत त्याचे स्वागत केले.

स्थानिक चौकशीनुसार इमारतीमध्ये एकूण ४१ सदनिका, १ कार्यालय, १ जीम, १ मोकळा हॉल होता. ए विंग मध्ये एकूण २१ सदनिका होत्या. यामध्ये रहात असलेल्या असलेल्या व्यक्तींची संख्या ५४ होती. सुखरूप बाहेर पडलेल्या व्यक्तींची संख्या ४१ असून अद्यापही सुरू आहे. बी विंग मध्ये २० सदनिका होत्या. यामध्ये रहिवास करीत असलेल्या व्यक्तींची संख्या ४३ होती. या दुर्घटनेवेळी सुखरूप बाहेर पडलेल्या व्यक्तींची संख्या ३७ आहे. तर अद्यापही या इमारतीमध्ये अडकलेल्या व्यक्तींची संख्या ६ आहे. अशा प्रकारे तारिक गार्डन या दुर्घटनाग्रस्त इमारतीमधील एकूण ४१ सदनिकांमध्ये राहत असलेल्या ९७ व्यक्तींपैकी ७८ व्यक्ती सुखरूप बाहेर पडू शकल्या. अद्यापही इमारतीच्या ढिगाऱ्याखाली १९ व्यक्ती अडकलेल्या आहेत. दुर्घटनास्थळी बचावकार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकांकडून युद्धपातळीवर शोधकार्य

दरम्यान कमकुवत बांधकाम हेच इमारत दुर्घटने मागचे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट झाले आहे त्याची गंभीर दखल घेत सर्व संबंधितां विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार महाडनगर पालिकेचे नगर अभियंता सुहास कांबळे यांनी बिल्डर फारुख काझी (रा. तळोजा, पनवेल) आर्किटेकट गौरव शहा (नवी मुंबई) आरसीसी सल्लागार बाहुबली धामणे (नवी मुंबई) महाडनगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी दीपक झिंजाड, तत्कालीन कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक शशिकांत दिघे यांच्याविरोधात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार शहर पोलिसांनी या पाच जणांविरुद्ध भादवि कलम ३०४ (सदोष मनुष्यवध), ३०४अ (निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत), ३३७ (जीवितास धोका निर्माण करणे), ३३८ (हलगर्जी मुळे दुसऱ्याचा जीवितास किंवा वैयक्तिक हानिस कारणीभुत ठरणे) आणि ३४ (संगनमत) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास महाडचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्री काशीद हे करणार आहेत.

पहाटे या दुर्घटनाग्रस्त ठिकाणी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते त्यांनी संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेत प्रशासकीय यंत्रणांना वेगाने मदतकार्य करण्याबाबत आवश्यक ते निदैश दिले यामधील दोशी विकासकावर त्या बरोबर कामासाठी परवानग्या देणाऱ्यावर कार्यवायी होणार असल्याचे सांगत तसेच या इमारतीचे स्ट्रक्चर ल ऑडीट होणे ..../२

'देव तारी त्याला कोण मारी', याचा प्रत्यय रायगडमधील इमारत दुर्घटनेच्या बचावकार्यादरम्यान आला. महाडमधील दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या ढिगाऱ्याखालून लहान मुलाला सुखरुप बाहेर काढण्यात आलं. तब्बल १९ तासांनंतर साडेतीन वर्षांच्या मोहम्मद बांगी या चिमुकल्याला ढिगाऱ्याखालून सुखरुप बाहेर काढलं. यावेळी सगळ्यांचाच चेहरा आनंदाने उजळून निघाला. टाळ्यांच्या कडकडाट झाला. शिवाय गणपती बाप्पा मोरयाच्या घोषणाही देण्यात आल्या. एनडीआरएफच्या जवानांना दोन पिलरमध्ये एक पाय हलताना दिसला. एका जवानांना पायाला अलगद स्पर्श करत त्याला खेचण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोहम्मदनेही त्यांना प्रतिसाद दिला आणि काही क्षणातच एनडीआरएफच्या जवानांनी तो पिलर कटरच्या साह्याने तोडून चिमुकल्या मोहम्मदला या ढिगाऱ्यातून सुखरुप बाहेर काढले. तब्बल १८ ते १९ तास अंधारात, उपाशी आणि भीतीच्या छायेत राहिलेल्या मोहम्मदने बाहेर आल्यानंतर एक शब्द उच्चारला तो म्हणजे 'अम्मी आणि अब्बू'.

महाड दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांच्या वारसदारांना मदत व पुनर्वसन विभागाकडून प्रत्येकी ४ लाख रुपये व मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाख रुपये असे एकूण ५ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदत :

विजय वडेट्टीवार, पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र राज्य

एसटी पास घोटाळा प्रकरण आणखी २ महिला आरोपींवर कारवाई

आत्ता पर्यंत आरोपींची एकूण संख्या ५

दै.रायगड नगरी । पेण

कोरोनामुळे उघडकीस आलेल्या एसटी पास घोटाळ्यातील आरोपी वाहक जनार्दन गंगाराम म्हात्रे, जितेंद्र जयेंद्र देशपांडे, रमेश भाऊराव पाटील या ३ आरोपींवर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याच प्रकरणात आणखी एका महिला वाहकाला निलंबित करण्यात आले आहे. तर एका महिला लेखाकारावर (अकाउंटंट) आरोपपत्र देण्यात आले आहे.

पेण येथील एसटी आगारात घडलेल्या लाखो रुपयांच्या एसटी पास घोटाळा प्रकरणात दिवसेंदिवस नव नवीन घडामोडी समोर येत असून या प्रकरणातील आरोपींची एकूण संख्या आता ५ झाली आहे.

त्यात २ महिलांचाही समावेश आहे.

पेण येथील एसटी आगारात प्रवाशांना पास देताना पासच्या ३ प्रती बनविण्यात येतात. त्यापैकी १ प्रत प्रवाशाला व दुसरी प्रत अकाउंट विभागाला तर तिसरी प्रत पेण आगार कार्यालयात ठेवण्यात येते. परंतु प्रत्यक्षात मात्र तिसरी प्रत कोरी ठेवून ती दुसऱ्याच प्रवाशांना दिली जात होती व त्या रकमेची अफरातफर करण्यात येत होती. या प्रकरणात आणखीन एक वाहक भक्ती पाटील यांच्या कारकिर्दीतही पासची प्रत कोरी भेटल्याने त्यांनाही निलंबित करण्यात आले आहे.

पेण एसटी आगारात ..../२

विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन ७ आणि ८ सप्टेंबरला

दै.रायगड नगरी । मुंबई

महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन येत्या ७ आणि ८ सप्टेंबर असे दोन दिवसांचे होणार आहे. सध्याची कोविड परिस्थिती पाहता सुरक्षित सोशल डिस्टन्सिंगचे निकष पाळून आणि सुरक्षेविषयी आवश्यक त्या उपाययोजना करुन हे अधिवेशन घेण्यात येणार आहे. पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने विधानसभा आणि विधान परिषद यांच्या कामकाज सल्लागार समितीची बैठका आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या.

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक अध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकांमध्ये हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकांमध्ये कोविड परिस्थितीत सुरक्षाविषयक मापदंडांचे पालन करुन अधिवेशनाचे कामकाज निश्चित करण्याबाबत चर्चा झाली. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी म्हणजे ६ सप्टेंबर रोजी सर्व सदस्यांची कोविड-१९ साठीची 'आरटीपीसीआर' तपासणी करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. ज्या सदस्यांची कोविड चाचणी निगेटिव्ह असलेल्या सदस्यांनाच सभागृहात प्रवेश दिला जाईल.

सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्यासाठी सदस्यांची बसण्याची व्यवस्था आवश्यकतेप्रमाणे सभागृहाच्या प्रेक्षक आणि विद्यार्थी गॅलरीमध्येही करण्यात येणार आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून प्रत्येक सदस्याला सुरक्षा किट देण्यात येणार आहे. ..../२

नेतृत्वाचे काँग्रेसी नाट्य

आणखी सहा महिने सोनिया गांधी काँग्रेस पक्षाच्या हंगामी अध्यक्षपदाची धुरा वाहतील आणि त्या काळात नवा अध्यक्ष निवडण्याची प्रक्रिया पूर्ण होईल, असा तात्पुरता तोडगा काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत काढण्यात आला आहे. त्या दिशेने खरोखरच काही प्रवास होईल का, ते आता दिसेलच. मात्र, काँग्रेस पक्षात गेले अनेक दिवस ठसठसत असलेले गळू कधीतरी फुटणारच होते. काँग्रेसच्या तब्बल २३ नेत्यांनी पक्षाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारे पत्र अध्यक्ष सोनिया गांधी यांना लिहिले आणि ते योग्य वेळी प्रसार माध्यमांपर्यंत पोहोचवले. किंबहुना, अशी पत्रे ही पक्षात आवश्यक ते बदल घडवण्यासाठी लिहिण्यापेक्षा ती प्रसार माध्यमांपर्यंत पोहोचवून त्यातून आवश्यक तो परिणाम साधण्यासाठीच असतात. काँग्रेसमध्ये नरेंद्र मोदी यांच्या झंझावतापुढे उभे राहण्याची ताकद उरलेली नसून त्यामुळे पक्षाचा सामान्य कार्यकर्ता नाउमेद झाला आहे. हेच वास्तव शाब्दिक फुलोऱ्यांमधून या पत्रातून समोर मांडले गेले होते. यामुळे, एकीकडे पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांनी पदाचा राजीनामा देऊ केला आहे आणि दुसरीकडे राहुल गांधी अध्यक्ष होण्यास तयार नाहीत, अशा पेचात काँग्रेस पक्ष सापडला आहे. काँग्रेसमध्ये असा पेच पहिल्यांदाच तयार झालेला नाही. अगदी पं. नेहरू यांच्या काळातही पुरुषोत्तमदास टंडन यांच्याशी पंडितजींचे तीव्र मतभेद होते. नेहरूंच्या अनेक धोरणांचा नव्हे तर निर्णयांचाही ते विरोध करत. मात्र, १९५२ सालच्या निवडणुकीपूर्वी नेहरूंनी काँग्रेस कार्यकारिणीचा राजीनामा दिल्यावर टंडन यांना शस्त्र खाली ठेवून नेहरूंचा मार्ग मोकळा करावा लागला. इंदिरा गांधींनी तर पक्षातल्या ज्येष्ठांना पूर्णपणे बाजूला सारल्याने पक्षात फूटच पडली होती. पक्षाच्या राष्ट्रपतिपदाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात व्ही. व्ही. गिरी यांना उमेदवारी देऊन त्यांना इंदिराजींनी जिंकवूनही आणले. त्यामुळे काँग्रेस पक्षात असे पेचप्रसंग पहिल्यांदाच तयार झालेत, असेही नाही. मात्र, यातून प्रत्येकवेळी काँग्रेस पक्ष नव्या दमाने उभा राहिला होता. आज तसे होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. कारण नेहरू आणि इंदिरा गांधी या दोघांनाही स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी होती आणि संघर्षाचा महात्मा गांधी यांचा वारसा होता. असहकार आंदोलनात मोतिलाल नेहरू यांनी वकिली सोडल्याने ज्या आर्थिक संकटाचा सामना नेहरू कुटुंबाला करावा लागला, त्याची झळ इंदिरा गांधींनाही बसली होती. इंदिरा गांधी दहा वर्षांच्या असताना त्यांनी खेळातला मोर्चा काढला होता. तेव्हा त्यांना त्यांच्या आत्यांनी विचारले असता त्या म्हणाल्या होत्या, 'मी जोन ऑफ आर्क होऊन या देशातील लोकांना स्वातंत्र्य मिळवून देणार आहे.' फिरोज गांधी यांच्याशी इंदिरा गांधी यांचे लग्न झाल्यावर काही दिवसांतच या दाम्पत्याला तुरुंगवास सोसावा लागला. त्यामुळे संघर्ष हा त्यांच्या नेणिवेचा भाग बनला होता. सध्याच्या काँग्रेस नेतृत्वाचे मात्र तसे नाही. नरेंद्र मोदी यांनी दिलेली 'खान मार्केट गँग'ची उपमा अनेक उदारमतवाद्यांना झोंबली असली तरी त्यात तथ्य आहेच. राहुल गांधी हे मोदींच्या आव्हानापुढे खुजे वाटण्याची कारणमीमांसा करण्यापुरता हा विषय नाही. मात्र, इतके मोठे आव्हान पेलण्यासाठी जनतेमध्ये जाऊन नागरिकांना संघटित करून त्यांचे नेतृत्व करण्याची धमक राहुल यांनी दाखवलेली नाही. त्यामुळे, काँग्रेसच्या तेवीस नेत्यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे अत्यंत योग्य असले तरी, ज्या नेत्यांनी हे प्रश्न उपस्थित केले आहेत, तेही खान मार्केट गँगमधले नाहीत का, हा प्रश्न उरतोच. राहुल हे केवळ ट्वीटरवरूनच संघर्ष करत असल्याचा आरोप होतो. मात्र, करोनानंतर उत्तर प्रदेशातल्या घरी परतणाऱ्या कामगारांची विचारपूस असो की, मोदींच्या करोनापासून ते चिनी सैन्याने भारतीय भूभाग घशात घालण्याच्या प्रश्नापर्यंत राहुल गांधीच काँग्रेस पक्षातून बोलताना दिसतात. काश्मीरचे मुख्यमंत्रिपद भूषवणारे व कायम राज्यसभेची जागा पदरात पाडून घेणारे गुलामनबी आझाद गेले वर्षभर काश्मीरमध्ये जे काही सुरू आहे, त्यावर अवाक्षर काढत नाहीत. महाराष्ट्रातील ज्या तीन नेत्यांनी या पत्रावर सही केली, त्यांच्याबाबत तर काय बोलावे? पृथ्वीराज चव्हाण यांच्या मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द आणि त्यांच्या नेतृत्वाखाली लढली गेलेली निवडणूक कशी होती, हे काँग्रेसच्या कोणत्याही कार्यकर्त्याला विचारावे. मुकुल वासनिक आणि मिलिंद देवरा हे मतदारसंघात किती वेळ देतात, जनतेच्या कोणत्या प्रश्नांवर संघर्ष करतात, हेही सगळ्यांना माहीत आहे. मात्र, अशा प्रकारचे नेतृत्व पक्षात तयार होण्यास कारणीभूत गांधी कुटुंबीयच आहेत, हे विसरता येत नाही. हुजरेगिरी करणाऱ्यांनाच महत्त्व द्यायचे व ज्यांना स्वत:चा जनाधार आहे, अशांना बाजूला सारायचे, यातूनच तर ममता बॅनर्जी, शरद पवार, जगनमोहन रेड्डी असे नेते बाहेर पडले आणि काँग्रेस पक्ष खंगत गेला. काँग्रेसची विचारधारा म्हणजे नक्की काय, स्वातंत्र्यलढ्यात नेहरूंच्या योगदानाबाबत शंका घेणाऱ्यांना इतिहास माहीत नसला तरी, वल्लभभाईंपासून ते सुभाषचंद्र बोसांपर्यंत बाकी कुणाचेच नाव कधीही न घेण्यामागील कारण काय, आदी अनेक गोष्टींचा विचार गांधी कुटुंबाने करायला हवा. विविध, धर्म, पंथ, भाषा, चालीरीती यांनी संपन्न असलेल्या या देशातील अपार वैविध्य दुर्लक्षून त्याला एकसाची बनवून एकाच कोंदणात बसवण्याच्या प्रयत्न देशाच्या भवितव्यापुढे प्रश्नचिन्ह लावू शकतात व हे रोखण्याची ताकद काँग्रेस पक्षातच आहे. हे ओळखून हा ऐतिहासिक पक्ष पुन्हा उभा करायचा असल्यास त्यात गांधी कुटुंबाने त्यांच्या वलयाची ताकद सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेचा हव्यास नसलेल्या सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभी करायला हवी. या पत्राच्या निमित्ताने एकंदरच काँग्रेसच्या कार्यपद्धतीबाबत जर गांधी कुटुंबासहित सर्व काँग्रेसजनांनी मिळून गांभीर्याने विचार केला तरच यातून नेमका मार्ग निघण्याची शक्यता आहे. अन्यथा, राहुल गांधी झिंदाबाद, सोनिया गांधी आगे बढो, प्रियांका गांधी, आँधी है, अशा घोषणा देत जातिवंत हुजरे पुन्हा सक्रिय झाले आहेतच.

१०८ रुग्णवाहिका आणि ऑक्सिजन उपलब्ध नसल्याने पालीत एकाने हकनाक गमावला प्राण!

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. १०८ रुग्णवाहिका बंद असल्याने आणि ऑक्सिजन उपलब्ध नसल्याने मंगळवारी (ता.२५) पालीतील एका ५७ वर्षीय रुग्णाला हकनाक आपला प्राण गमवावा लागला.

पालीतील समर्थ नगरमधील एका ५७ वर्षीय रुग्णास कोविड-१९ मुळे श्वास-ोत्सवास घेण्यास त्रास होऊ लागला होता. त्यांना ताबडतोब पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले. तिथे

१०८ रुग्णवाहिका बंद असली तरी ३ कंपन्यांमधील रुग्णवाहिका सेवेसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यातील एका रुग्णवाहिकेत ऑक्सिजनची व्यवस्था आहे. तसेच १०८ रुग्णवाहिकेच्या दुरुस्तीचा प्रस्ताव देखील पाठवला आहे. लोकांनी थोडीजरी कोविडची लक्षणे आढळल्यास घरी न बसता किंवा खाजगी डॉक्टर कडे उपचार न घेता ताबडतोब सरकारी दवाखान्यात जावे.

दिलीप रायण्णावार, तहसीलदार, पाली-सुधागड

गेल्यावर त्यांना ऑक्सिजन न लावता व ऑक्सिजन पातळी तपासणी करून अधिक उपचारासाठी लागलीच रोहा येथे नेण्यास सांगितले. मात्र रुग्णाला नेण्यासाठी १०८ नंबर रुग्णवाहिका बंद होती. मागील ६-७ दिवसांपासून इंजिनमध्ये बिघाड असल्याने ही रुग्णवाहिका बंद आहे. तसेच ऑक्सिजन नसलेली दुसरी कुठलीही रुग्णवाहिका उपलब्ध नव्हती. अखेर त्यांना त्यांच्या खाजगी गाडीमधून ऑक्सिजन शिवाय रोहा

केवळ रुग्णवाहिका आणि ऑक्सिजन नसल्याने या रुग्णाचा जीव गेला आहे. लागलीच उपचार आणि रुग्णवाहिका मिळाली असती तर कदाचित त्यांचे प्राण वाचले असते. केवळ आरोग्य विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे हे झाले आहे.

कपिल पाटील, प्रत्यक्षदर्शी

१०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेच्या इंजिनमध्ये बिघाड असल्याने ती काही दिवसांपासून बंद आहे. १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका महिलांच्या प्रसूतीसाठी वापरली जाते. आवश्यकता असल्यास कोलाड व रोह्यावरून रुग्णवाहिका मागवतो. तिथे उपलब्ध असल्यास रुग्णवाहिका मिळते. तसेच महाड येथे इमारत दुर्घटना झाल्यामुळे जिल्ह्यातील काही रुग्णवाहिका तिथे देखील गेल्या आहेत. पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात ऑक्सिजन उपलब्ध आहे मात्र ते प्रवासासाठी (ट्रान्सपोर्टेशन) वापरले जात नाही.

डॉ. शशिकांत मढवी, तालुका वैद्यकीय अधिकारी

येथे रुग्णालयात न्यावे लागले. आणि तिथे गेल्यानंतर त्यांची प्राणज्योत मावळली असे प्रत्यक्षदर्शी कपिल पाटील यांनी सांगितले. मृत व्यक्ती २ वेळा वावळोली येथील कोविड केअर सेंटरमध्ये तपासणीसाठी गेले होते. तिथे त्यांना लक्षणे नाहीत असे सांगून आणि कोविडची तपासणी करायची असल्यास रोहा किंवा अलिबागलाजा असे सांगण्यात आले.

इंटकच्या पाठपुराव्यामुळे पालिका कामगारांची वेतनवाढ

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

महापालिका प्रशासनात आरोग्य विभागात काम करणार्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनयूएचएम) काम करणारे डाटा एंण्ट्री ऑपरेटर, सहाय्यक परिचारिका (एएनएम), वाहनचालक, औषध निर्माता, स्टाफ नर्स या सर्वाच्या वेतनात पालिका प्रशासनाने वेतनवाढ मिळाली आहे. या कर्मचार्यांच्या वेतनात वाढ व्हावी, समान कामाला समान वेतन हा निकष लावावा या मागणीसाठी नवी मुंबई इंटकचे अध्यक्ष रवींद्र सावंत हे गेल्या दोन वर्षापासून पाठपुरावा करत होते. इंटकच्या पाठपुराव्यामुळे वेतनवाढ झाल्याची प्रतिक्रिया संबंधित कर्मचार्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

संबंधित कामगारांच्या वेतनवाढ यासह अन्य समस्यांबाबत नवी मुंबई इंटकचे अध्यक्ष रवींद्र सावंत यांनी विधानसभा अध्यक्ष नाना पटोळे यांच्याकडेही पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्याची दखल घेत नाना पटोळे यांनी त्यांच्या दालनात महापालिका आयुक्त अण्णासाहेब मिसाळ, पालिका अधिकारी व कामगार संघटना यांच्यामध्ये बैठक घडवून आणतानना संबंधित कामगारांना लवकरात लवकर न्याय देण्याचे निर्देश पालिका प्रशासनाला दिले होते. स्वत: विधानसभा अध्यक्ष नाना पटोळे नवी मुंबईतील कामगार समस्या सोडविण्यात पुढाकार घेत असल्याचे पाहून पालिका प्रशासनाने कामगारांच्या वेतनवाढीच्या प्रक्रियेला गती दिली असल्याची माहिती रवींद्र सावंत यांनी दिली.

या कामगारांना अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तुलनेत पालिका प्रशासनाकडून कमी वेतन मिळत आहे. तेथील महापालिका प्रशासनात काम करणार्यांना मिळणारे वेतन व नवी मुंबई महापालिका प्रशासनातील जुन्या अनुभवी कर्मचार्यांना कमी वेतन ही वस्तूस्थिती इंटकच्या माध्यमातून रवींद्र सावंत यांनी महापालिका प्रशासनाच्या निदर्शनासही आणून दिली होती. तत्कालीन आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांच्याही सतत भेटीगाठी घेत संबंधित कामगारांच्या वेतनवाढीसाठी पाठपुरावा केला होता. मिसाळ यांनी दोन वर्षाच्या पाठपुराव्यानंतर संबंधित कामगारांच्या वेतनवाढीच्या एका फाईलवर सही केल्याची व विद्यमान आयुक्त अभिजित बांगर यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती कामगार नेते रवींद्र सावंत यांनी दिली. या कामगारांना गेली अनेक वर्षे अवघ्या ६ ते ७ हजार रूपये मासिक वेतनावर काम करावे लागत होते.

१ जुलै २०२० पासून या कामगारांच्या वेतनवाढीचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतल्यामुळे किमान वेतन ६ ते ७ हजार रूपयावर काम करणार्या कामगारांना आता २० हजार २१३ रूपये वेतन मिळण्यास या महिन्यापासून सुरूवात झाली आहे. बहूउद्देशीय संवर्गात काम करणार्या अर्धकुशल कामगारांना इतकी वर्षे काम केल्यामुळे त्यांना कुशल कामगार म्हणून पदोन्नती मिळावी म्हणून इंटकच्या माध्यमातून रवींद्र सावंत यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे पालिका प्रशासनान संबंधित कामगारांना कुशल कामगार म्हणून बढती दिल्याची व वेतनवाढ झाल्याची माहिती कामगार वर्गाकडून देण्यात येत आहे.

इंटकच्या पाठपुराव्यामुळे यंदाच्या वर्षी गणपती बाप्पाच आम्हाला पावला असल्याची प्रतिक्रिया पालिका प्रशासनात काम करणार्या परिचारिका, डाटा एण्ट्री ऑपरेटर, औषध निर्माता आदी संवर्गातील कामगारांकडून व्यक्त करण्यात येत आहे. कामगारांच्या प्रश्नाविषयी आम्ही सातत्याने पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत होतो. त्या त्या वेळी नवी मुंबईतील पत्रकारांनीही कामगारांच्या समस्यांना, इंटकच्या पाठपुराव्याला प्रसिध्दी देण्याचे काम केले. पत्रकारांच्या सहकार्यामुळेच कामगार वर्गाचे प्रश्न सुटण्यास मदत झाली असल्याची प्रतिक्रिया नवी मुंबई इंटकचे अध्यक्ष रवींद्र सावंत यांनी दिली.

प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या तातडीने सिडकोने सोडविण्याची शिवसेनेची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या तातडीने सिडकोने सोडवाव्यात अशी मागणी आज सिडकोचे नवनिर्वाचित व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी ह्यांची रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार व प्रकल्पग्रस्तांचे नेते बबनदादा पाटील यांच्यासह शिव-सेना जिल्हाप्रमुख शिरिष घरत व राष्ट्रवादीचे नेते सुदाम पाटील यांनी भेट घेवून करण्यात आली आहे.

यावेळी डॉ. मुखर्जी ह्यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या तातडीने सोडवण्याबाबत निवेदन देण्यात आले. व लवकरच प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधण्यासाठी एका बैठकीचे आयोजन करण्याची विनंती जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी यावेळी केली.

आरोग्यम क्लिनिक वतीने मोफत शारीरिक तपासणी

दै.रायगड नगरी । उरण

कोरोनाचे वाढते रुग्ण पाहता उरण शहरा-तील कामठा येथील जय शिवराय युवक मंडळ यांनी दर वर्षा प्रमाणे गणेशौत्सवाचे यंदा आयोजन करण्यात आले होते.

यंदा कोरोनाचे वाढते रुग्ण पाहता मंडळाच्या सहकार्याने व आरोग्यम क्लिनिक यांच्या वतीने रविवार (दि. २३)रोजी कामठा येथे सुमारे ५० नागरिकांचे शारीरिक तापमान व ऑक्सिजन लेवल यांची मोफत तपासणी करून मोलाचा सल्ला दिला.

या प्रसंगी जय शिवराय युवक मंडळ चे कार्यकर्ते भूषण घरत, कुणाल पाटील, निलेश कदम, दिपक कदम, भावेश फराड, देवेंद्र फराड, सदस्य, वसंत कुडव, विना कुडव डॉ. वर्षा कुडव, प्रथमेश कामथ, यांचे सहकार्य मिळाले.

कोप्रोली विभागातील विजवितरणच्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक

दै.रायगड नगरी । उरण

उरण पूर्व विभागातील सारडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या अतिशय दुर्गम अशा डोंगरात वसलेल्या बेलवाडी आदिवासी वाडीवर वादळी पावसासह मोठे नुकसान होऊन विजेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तेथील आदिवासिंना वीजे विना काळोखात रहावे लागत होते. मात्र वीज वितरणच्या कोप्रोली विभागातील कर्मचाऱ्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत वादळी पाऊस कोसळत असतांना देखील या वाडीवर विजेचा पुरवठा पूर्ववत करण्याचे काम केले. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी विजेचा प्रश्न उद्भवत आहे.परंतु पाऊस असो वा ऊन जनतेच्या सेवेसाठी वीज वितरण कंपनीच्या कामगारांना नेहमी तत्पर रहावे लागत आहे. असाच विजेचा प्रकार बेलवाडी आदिवासी वाडीवर वादळी पावसात गेले पंधरा दिवस गायब होती. त्या वाडीवर जाणारी वायर ही अशा वाटेवरून जाते की त्या वाटेवरून कोणीही माणूस जाऊ शकत नाही. अशा वाटेतून आपला जीव धोक्यात घालून कर्मचाऱ्यांनी विजेची दुरुस्ती करून येथे जाणारी वीज पुरवत करण्याचे काम केले आहे.

हे काम कोप्रोली वीज वितरण विभागाचे वीज तंत्रि समाधान म्हात्रे, कुंदन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पूर्ण केले. त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन वीज वितरण चे मयेकर, खाटिक साहेब यांनी केले.या सर्व कार्यशील टीमचे उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार आणि राजेंद्र मढवी यांनी आभार मानले आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

महाड इमारत दुर्घटना १२ मृतदेह बाहेर काढले

गरजेच होते असे एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

गेली दोन दिवस महाडच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप या स्वःता घटनास्थळी दाखल आहेत इमारतीची घडलेली दुर्घटना अतिशय दुदैवी आहे माझेकडे या इमारतीबाबत रहिवाशांची कोणतीही तक्रार आली नव्हती जर का तक्रार आली असती तर निश्चित नगरपालिकेने यावर ठोस उपाय योजना केल्या असत्या ज्या पाच लोकांनवर गुन्हा दाखल केला आहे त्यामध्ये २०११ ला हि बिल्डींग परमिशनला आली होती २०१३ भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते या सगळ्या गोष्टी करत असतांना नगर पालिकेनी सगळ्या गोष्टींची पूर्तता करत सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या राहिला प्रश्न आर.सी.सी.कन्सलटंट बिल्डर आर्किटेक्ट हे सर्वस्वी या दुर्घटनेला जबाबदार आहेत अशा नगराध्यक्षा स्नेहल जगताप म्हणाल्या .

रायगड जिल्हयाच्या पालकमंत्री आदिती तटकरे याही गेली दोन दिवस घटनास्थळी दाखल होत्या विशेष समिती नेमून इमारत दुर्घटने संदर्भात सखोल चौकशी करून संबंधितांवर कार्यवायी होणे गरजेच आहे असे तटकरे म्हणाल्या.

बिल्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला होता काल दुर्घटना घडल्या नंतर आज ही इमारतीचा ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे या घटनास्थळी कालपासून चर्चा होती ते ढिगार्यात अडकलेल्या तिघा चिमुरड्याची. या तिघा चिमुरड्यांच्या बिल्डिंग दुर्घटनेत काय झाला असेल अशी चर्चा सर्वच करत होते त्यानंतर आज पहिल्यांदाच बातमी समोर आली तब्बल १९ तासानंतर या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली एका मुलाला सुखरूप बाहेर काढण्यात एनडीआरएफच्या टीमला यश आलं आहे मात्र त्याच्या आईला आपला प्राण गमवावा लागला आहे मातीच्या ढिगामधून बाहेर काढताना हा मुलगा सुखरूप बाहेर काढल्यानंतर तेथे उपस्थितांनी मोठ्या नी टाळ्या वाजवल्या आणि गणपती बाप्पा मोरया च्या घोषणा देखील दिल्या एनडीआरएफच्या या पथकाने मेहनत घेऊन या लहानग्याला बाहेर काढले आहे.

सय्यद अमित समीर, वय ४५ वर्ष, नविद झमाने, वय ३५ वर्ष, नौसिन नदीम बांगी, वय ३० वर्ष, आदी हाशिम शैकनग, वय १६ वर्ष, अनोळखी स्त्री चा मृतदेह, रोशनबी देशमुख, वय ५६ वर्ष, ईस्मत हाशिम शैकनक, वय ४२ वर्ष, फातिमा अन्सारी, वय ४० वर्ष, अल्लतिमस बल्लारी, वय २७ वर्ष, शौकत आदम अलसूलकर, वय ५० वर्ष हे या दुर्घटनेत मृत्यमुखी पडले आहेत. या दुर्घटनेतील जखमिना महाडच्या ट्रामाकेअर युनिट शहरांतील काही खाजगी रुग्णालये आणि गंभीर जखमिना मुंबई येथे पाठविण्यात आले आहे .

सात ते आठ वर्षा पूर्वी ही इमारत बांधली होती ४७ कुंटूंबे या इमारतीत होती २०० ते २२५ रहिवासी यामध्ये रहात होते सोमवारी सकाळी दहा वाजनेचे दरम्यान या इमारतीच्या तळ मजल्यावरचा एक आर . सी . सी . कॉलम मधोमध तुटला हे पहाता येथील काही रहिवाशांनी सदरच्या बिल्डरला घडलेल्या घटनेची माहिती दिली मात्र आपण त्या तुटलेल्या भागाच पॅल्स्टर करू अस थातूरमातूर उत्तर त्यांना समोरुन मिळाल घटनेच गांभिर्या त्याच वेळी घेतल गेल असत तर यातुन निरपराधाचे बळी वाचले असते म्हणजे घटनेची चाहुल सकाळी लागली आणि इमारत संध्याकाळी जमिनदोस्त झाली हे दुदैव म्हणाव लागेल.

या इमारती मधील – विंग मध्ये ५५ रहिवासी होते तर बी विंगमध्ये ४४ रहिवासी होते इमारत गेल्या दोन तीन दिवसांपासून हालत असल्याने – विंगमधील ४२ तर बी विंग मधील ३ ८ रहिवासी इमारत सोडून निघून गेले होते . – विंग मधील १३ आणि बी विंग मध्ये ६ रहिवासी अडकले असल्याची महिती प्रशासनाला उपलब्ध झाली. इमारत हलू लागल्यानंतर इमारती मधील रहिवाशांनी इमारती मधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला मात्र त्याना बाहेर पडता आले नाही. आज जे मृतदेह या इमारतीच्या ढिगाऱ्या मध्ये आढळून आले त्यातील बहुतांशी मृतदेह हे इमारती मधील जीन्या जवळ आढळून आले आहेत. दुर्घटने नंतर रायगड च्या जिल्हाधिकारी निधी चौधरी, पोलीस अधिक्षक अनिल पारसकर हे घटनास्थळी तळ ठोकून आहेत.

दुर्घटना ग्रस्त इमारती मधील कुटूंबातील सदस्य यांनी देव बलवत्तर म्हणून आम्ही काही सेकंदात बाहेर पडलो नाहीतर ....असे सांगून त्यांनी या इमारती च्या खाली काही जण अडकले असल्याची माहिती रहिवासी अयुब चिंचकर यांनी दिली. सायंकाळी व्यायाम करून आल्यानंतर मी किचनमध्ये काही खाण्यासाठी बसलो होतो. त्यावेळी फ्रिज काहीसा खाली गेल्याचे दिसले. म्हणून मी कुटुंबाला सोबत घेऊन पाचव्या मजल्यावरून ओरडत सगळ्यांना घेऊन खाली आलो. तळमजल्यावर आल्यावर इमारतीचा पिलर तुटू लागला. तर काही सेकंदात दुसरा पिलर तुटण्यास सुरुवात झाली. तेव्हा आम्ही तातडीने सर्वजण दुसऱ्या इमारतीत पोहचलो. त्यानंतर काही क्षणात इमारत जमीनदोस्त झाली. काही सेंकदाचा फरक पडला नाहीतर आम्हीही त्यात अडकलो असतो, अशी प्रतिक्रिया जावेद चिंचकर या बचावलेल्या रहिवाशी तरुणाने दिली.

जखमी रहिवासीयाचे माजी आ माणिक जगताप यांच्यासमवेत माजी नगराध्यक्ष महंमदअली पल्लवकर यांनी विचारपुस करत चौकशी केली या वेळी बोलताना जगताप यांनी मृताच्या नातेवाईक , जखमींना व बाधित कुटुंबातील सदस्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

आणखी २ महिला आरोपींवर कारवाई

तत्कालीन अकाउंटंट प्रेक्षा जवके यांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी त्यांना आरोपपत्र देण्यात आले आहे. प्रत्यक्षात अकाउंटंट यांनी (फिजिकल ऑडिट) कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी करणे गरजेचे होते. पेण एसटी आगारातील एकूण १५ पासचे बुक गहाळ झाले आहेत. तत्कालीन अकाउंटंट यांनी त्यावेळी या बुकांची प्रत्यक्ष तपासणी केली असती तर घोटाळा प्रकरण यापूर्वीच उघडकीस आले असते. त्यामुळे घोटाळ्याची व्याप्ती कमी झाली असती. म्हणून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी प्रेक्षा जवके यांनाही आरोपपत्र देण्यात आले आहे. लाखो रुपयांचा घोटाळा होऊन सुद्धा आजही पेण एसटी आगारात लेखाकार (अकाउंटंट) जागा रिक्तच आहे. याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

एसटी पास घोटाळा प्रकरणातील सर्व ५ आरोपी विरोधात पेण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र सदर प्रकरणी तातडीने तपास करून एसटीचे घोटाळा झालेले लाखो रुपये लवकरात लवकर परत मिळावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे यांनी केली आहे.

अधिवेशन ७ आणि ८ सप्टेंबरला

या किटमध्ये फेस शील्ड, मास्क, हॅण्ड ग्लोव्हज, सॅनिटायझर आदी वस्तूंचा समावेश असेल.

सदस्यांच्या स्वीय सहायकांना विधानमंडळात प्रवेश दिला जाणार नाही. मात्र, स्वीय सहायकांची आणि सदस्यांच्या वाहनचालकांची बसण्याची तसेच अल्पोपहार आदी व्यवस्था विधानमंडळ परिसरात तंबू (टेन्ट) टाकून करण्यात येईल.

या अधिवेशनात शोक प्रस्तावावर चर्चा, अतारांकित प्रश्न, पुरवणी मागण्या, विनियोजन विधेयक यावर चर्चा घेण्यात येतील. यामध्ये ७ शासकीय विधेयके आणि एक विनियोजन विधेयकाचा समावेश असेल, अशी माहिती विधानमंडळ सचिव राजेंद्र भागवत यांनी यावेळी दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

मुंबई एअरपोर्टनंतर आता नवी मुंबई विमानतळ अदानी समूहाच्या घशात?

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

देशातील सहा विमानतळांच्या व्यवस्थापनाचा ठेका असलेल्या अदानी ग्रुपने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे ७४ टक्के भाग खरेदी करण्याच्या हालचाली सुरू केल्याचे समजते. तसे झाल्यास मुंबई विमानतळाचे व्यवस्थापन करणाऱ्या मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. (मिआल) या जीव्हीके समूहाच्या कंपनीचे अधिकार संपुष्टात येणार आहेत. परिणामी, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळसुद्धा अदानी ग्रुपच्या घशात जाण्याची शक्यता जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील पहिले ग्रीनफिल्ड विमानतळ असणार आहे २२६८ हेक्टर जागेरव सुमारे १६ हजार कोटी रुपये खर्च करून हे विमानतळ उभारले जात आहे. या विमानतळाचे कंत्राट मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापन करणाजया जीव्हीके समूहाला देण्यात आले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड आणि मिआल या दोन्ही कंपन्या जीव्हीके एअरपोर्ट होल्डिंग कंपनीच्या उपकंपन्या आहेत. तर सिडको नोडल एजेन्सी म्हणून या प्रकल्पाचे काम पाहणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापन अदानी समूहाकडे गेल्यास जीव्हीकेची उपकंपनी असलेल्या मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड अर्थात मिआलचे अधिकारही संपुष्टात येणार आहेत. त्याचा थेट परिणाम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कंत्राटावर होण्याची शक्यता जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, उच्चस्तरीय समितीच्या मंजुरीनंतर शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीसाठी जीव्हीके कंपनीची निवड केली आहे. त्यामुळे असा कोणताही बदल झाल्यास जीव्हीकेने सिडकोला कल्पना देणे गरजेचे आहे. तसेच त्यासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र घेणेसुद्धा तितकेच बंधनकारक आहे. परंतु आतापर्यंत अशा प्रकारच्या कोणत्याही बदलाची जीव्हीकेकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे सिडकोच्या वरिष्ठ सूत्राने सांगितले. जीव्हीके आणि सिडकोबरोबर झालेल्या करारातील तरतुदी तपासून पाहिल्या जातील. सर्व प्रकारच्या कायदेशीर बाबी तपासूनच शासनाच्या मंजुरीनंतर यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असेही या सूत्राने स्पष्ट केले आहे.

येत्या चार-पाच दिवसांमध्ये मासेमारीला सुरुवात होईल ; मच्छीमार बांधवांचा अंदाज

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

मार्च महिन्याच्या अखेरीस लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर मासळीची मागणी घटल्याने अनेक मच्छीमार बांधवांनी आपला मासेमारीचा व्यवसाय बंद ठेवला होता. त्यानंतर मे महिन्यामध्ये लॉकडाऊन मध्ये काही प्रमाणात शिथिलता झाल्यानंतर मासेमारीला प्रारंभ करण्यात आला होता. परंतु पर्यटक श्रीवर्धन तालुक्यात येत नसल्याने देखील मासळीच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे पाहायला मिळत होते.

हवामान खात्याने तीन जून रोजी श्रीवर्धन, हरिहरेश्वर समुद्रकिनारा व संपूर्ण कोकण किनारपट्टीवर निसर्ग चक्रीवादळ धडकेल असा अंदाज वर्तविला होता. परंतु दोन जूनच्या सायंकाळपर्यंत देखील समुद्र शांत असल्याने अनेक बोटी श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावरती मच्छिमारी करताना दिसून आल्या होत्या. परंतु चक्रीवादळ झाल्यानंतर मासेमारी संपूर्णपणे बंद करण्यात आली. कारण समुद्र मोठ्या प्रमाणात खवळलेला होता. १ जून ते ३० जुलै या काळात मच्छीमारीसाठी बंदी असल्याने मच्छिमारांनी आपल्या होड्या पाण्यातून वरती घेऊन शाकारून ठेवण्यात आल्या होत्या. त्यानंतर नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण केल्यानंतर मासेमारीला सुरुवात होईल, अशी आशा मच्छीमार बांधवांना होती. परंतु नारळी पौर्णिमेच्या पूर्वसंध्येलाच समुद्र मोठ्या प्रमाणात खवळला व जोरदार वादळी वार्यांसह पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे अद्याप पर्यंत मासेमारी पूर्णतः बंद आहे.

मात्र आजपासून वाऱ्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे व समुद्र देखील काही प्रमाणात शांत झाला आहे. काही लहान होड्या तुरळक प्रमाणात श्रीवर्धन समुद्रकिनारी मासेमारी करताना दिसून येत होत्या. परंतु येत्या चार ते पाच दिवसात समुद्र पूर्णपणे शांत झाल्यानंतर पुन्हा एकदा मासेमारीला चांगल्याप्रकारे सुरुवात होईल. असा अंदाज मच्छीमार बांधवांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

तसेच एक सप्टेंबर नंतर राज्यातील सर्व हॉटेल्स देखील सुरू करण्याचा निर्णय झाला असल्याने श्रीवर्धन तालुक्यात पुन्हा एकदा पर्यटक नेहमीप्रमाणे यायला सुरुवात करतील व हॉटेल्स देखील सुरू झाल्यामुळे मच्छीला चांगल्याप्रकारे मागणी वाढेल असा अंदाज देखील मच्छीमार बांधवांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

गणपती सणानिमित्त स्वच्छते बाबतीत गटनेते प्रसाद सावंत यांनी केले बारकाईने लक्ष केंद्रित

दै.रायगड नगरी । माथेरान

गौरी गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर अनेक भक्तगण दरवर्षीप्रमाणे बाप्पाच्या दर्शनासाठी गावातील दूरवर असलेल्या भागात सुद्धा बंगल्या ठिकाणी सहकुटुंब जात असतात. पावसाळा असल्याने अनेकदा रस्त्यावर कचरा वाहून येत असतो त्यामुळे दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना काही अडचणी निर्माण होऊ नये यासाठी नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत यांनी सफाई कामगारांना१सूचना देऊन गौरी गणपतीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी रोड, पांडे रोड, सहदेव सावंत रोडची प्रत्यक्ष उभे राहून साफसफाई करून घेतली.

त्याचप्रमाणें रात्रीअपरात्री सुध्दा गणेशोत्सव काळात नागरिकांची रहदारी सुरू असते.त्यामुळे बहुतांश भागात विद्युत पुरवठा खंडित झाला होता. नागरिकांच्या याबाबत सतत तक्रारी येत असल्याने प्रसाद सावंत यांनी मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांच्याशी चर्चा करून संबंधित ठेकेदार सचिन जुकर यांना अनियमित सेवा देत असल्याबद्दल पाच हजार रुपये दंड आकारला आहे. त्यामुळे नागरी वस्तीत त्याचप्रमाणे मुख्य रस्ते पॉईंट कडे आणि दूरवर बंगल्याच्या भागातील रस्त्यावर विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचेवातावरण दिसत आहे.

उत्तर रायगड जिल्हा शिक्षक सेलच्या अध्यक्षपदी के. सी. पाटील

दै.रायगड नगरी । पनवेल

भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हा शिक्षक सेलच्या अध्यक्षपदी के. सी. पाटील यांची नियुक्ती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाहीर केली आहे. के. सी.पाटील यांनी शिक्षक म्हणून अनेक विद्यार्थ्यांचे करिअर घडविले. त्यांनी कोकण विभागीय शिक्षक संघटनेचे तसेच रायगड जिल्हा संघटनेचे प्रत्येकी पाच वर्षे अध्यक्षपद, आणि तालुका शिक्षक संघटनेचे १५ वर्षे अध्यक्षपद भूषविले आहे. त्यामुळे शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी के.सी.पाटील काम करतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या नियुक्तीबद्दल व्यक्त केले आहे.

पिठात साकारले दीड दिवसाचे श्री गणराय डॉ.रोहीत प्रभूची नाविण्यपूर्ण संकल्पना

खऱ्या अर्थाने इको फ्रेंडली गणरायाची मुर्ती

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

माणगांव येथील तरुण डॉक्टर रोहीत रमेश प्रभू नुकतेच आपले आयुर्वेद वैद्यकिय शिक्षण पूर्ण करुन आले, कोरोनाचे संकट असल्याने सध्या ते घरीच आहेत. अजूनही पुढील उच्च शिक्षण घेण्याचा त्यांचा मानस आहे. आपल्या आईच्या म्हणजेच सौ. रश्मी रमेश प्रभू यांच्या मनात यंदा दीड दिवसाच्या श्री गणरायाची स्थापणा घरी करावी अशी प्रबळ ईच्छा झाल्याने, तिने आपला लेक डॉ. रोहीत जवळ ही गोष्ट बोलून दाखवली आणि या कोरोना काळातही घरी पहिल्यांदाच श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्याचा संकल्प सिध्दीस नेला आहे. आईच्या ईच्छापूर्ती साठी डॉक्टर रोहीत ने स्वतः घरीच मुर्ति बनविण्याचा निर्णय घेतला आणि चक्क दूधात गव्हाच पिठ, हळद, पिठी साखर एकत्रीत मळून मुर्ती तयार केली.



वावडिंगाचा वापर करुन मुर्तिचे रेखीव डोळे तयार केले, लाल कुंकू वापरुन पितांबर रंगविले. नैसर्गिक चौकोनी आकाराच्या दगडाची बैठक ठेवून अतिशय सुबक अशी दहा इंच आकाराची गणरायाची मूर्ती त्यावर साकारली. या कामी बहिण रेवती हिने मदत केली. तसेच अतिशय ईको फ्रेंडली पर्यावरणास पूरक गणपतीस, आपल्या घराचे अंगणातील कमळ लावण्यासाठी तयार केलेल्या छोट्या सिंटेक्स टाकी सदृष्य तलावात विसर्जीत केले.

तलावात गप्पी जातीचे मासे पाळले आहेत, ते या विसर्जीत मुर्तीचे विरघळलेले पिठ खाऊन टाकतील. त्यामुळे प्रदूषण देखिल होणार नसल्याचे डॉ. रोहीतने सांगितले. इकडे कोकणात नागपंचमीला पिठाचा किंवा नागवेलीचा प्रतिकात्मक नाग बनवितात परंतू पिठाचा गणराय अतिशय नाविण्यपूर्ण संकल्पना तसेच मूर्ती स्वतः बनविण्याचे एक आगळेवेगळ समाधान व कलेचे संस्कार जोपासण्यास मदत होते. त्या मुळेच डॉक्टर रोहीत यांच्या या संकल्पनेचे माणगांवकर मित्र परिवारांकडून खुपच कौतुक होत आहे.

कोरोना विषाणूची भीती दूर करण्यासाठी आकर्षक देखावा ; कागदी फलकाद्वारे केली जनजागृती

दै.रायगड नगरी । आगरदांडा

गणेशोत्सवातील सजावटीच्या माध्यमातून सामाजिक संदेशातुन कोरोनाचा महा रोगाला हद्दपार कश्या प्रकारे करता येईल हा देखवा थर्माकोलचा वापर न करता पर्यावरणपूरक अश्या कागदी पुठ्याचा वापर करून सुंदर अशी सजावट करून सामाजिक संदेश देण्याचे प्रयत्न खारअंबोली येथील माजी सरपंच मनोज कमाने यांचे चिरंजीव यांचे मोहित कमाने यांनी केला आहे. यंदाच्या या उत्सवात फार तुरळक ठिकाणी सजावट करण्यात आली आहे.त्यापैकी आंबोली येथील देखावा सर्वोत्कृष्ट ठरला असून कोरोना रोगाची भीती दूर करण्याचा प्रयत्न याद्वारे करण्यात आला आहे.

या देखातुन मोरया मोरया कोरोनाला हद्दपार करू या , कोरोना(कोव्हिड-१९) ची पोलखोल करणारा चिनी डॉक्टर- लो - विनलिवामा, चीनने भारतीय सीमेवर केलेल्या उल्लंघनाबाबत चिनला धडा शिकवायचा असेल तर चिनी ऍप, चिनी वस्तुंवर बहिष्कार टाका स्वदेशीचा वापर करा असा संदेश सुद्धा या देखाव्यातून देण्यात आला आहे., या देशात कॅन्सर व टीबी सारखे मोठे रोग येऊन गेले व ते सुद्धा आहेत परंतु या रोगाला कोण घाबरत नाही मग कोरोना का घाबरता आत्मनिर्भर बना व स्वतःबद्दल आत्मविश्वास वाढवा असे या देखाव्यातून सांगण्यात आले आहे.

सामाजिक अंतर पाळा कोरोना टाळा, थोड्या दिवसात कोरोनावर भारतीय लस येत आहे.अशी अशा सुद्धा या देखाव्यातून देण्यात आली आहे., डॉ अहमद कलबसकर हे गोरगरीब जनतेवर पैशाची अपेक्षा न करता अल्प दरात कोरोना काळात उपचार करीत आहेत. त्याच प्रमाणे आरोग्य अधिकारी व कर्मचारी,पोलीस महसूल यंत्रणा यांचे सुद्धा कौतुक करण्यात आले आहे. कोरोना व्हायरस ला रोखाव्याचे आहे मास्क घाला हात साबणाने धुवा व स्वतःची काळजी घ्या असे संदेश देण्यात आले आहेत. कोरोना विषाणू मुळे आजारी पडणाऱ्या रुग्णाककडून उपचारासाठी खाजगी रूग्णालयांकडुन गोरगरीब जनतेची होणारी लुट थांबविणयासाठी शासनाने लक्ष घालावे अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.

कोरोनाची लक्षणे -डोकेदुखी, खोकला, स्नायु दुखु लागतात, ताप आणि थकवा, विघ्नहर्ता अशी लक्षणे सुद्धा देण्यात आली आहेत.श्री गणेशा कोरोना संकट दूर करा अशी पार्थना सुद्धा करण्यात आली आहे. कोरोना विषाणूपासून बचाव करण्यासाठी गरम पाण्याची वाफ घ्या त्याच प्रमाणे गरम पाणी पाच वेळा सेवन करा असे घरगुती उपाय सांगून उत्कृष्ट जनजागृती करण्यात आली आहे. या देखाव्याबाबत मुरुड तहसीलदार गमन गावीत यांनी समाधान व्यक्त केले असून सदरच्या देखाव्यामुळे कोरोना विषाणू ची भीती दूर होण्यास मदत होणार आहे.एका सजावटी मधून उत्कृष्ट असा जनजागृतीचा संदेश दिल्याबद्दल सजावटकार मोहित कमाने यांचे त्यांनी कौतुक केले आहे.

अल्पसंख्याक समाजाने शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा : सय्यद अकबर

दै.रायगड नगरी । पनवेल

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे.या योजनेचा लाभ धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी घ्यावा,असे आव्हान भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश सचिव सय्यद अकबर यांनी केले आहे.

पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्ये क्रमानुसार धार्मिक अल्पसंख्याक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, पारसी, बौद्ध व जैन आदी धार्मिक अल्पसंख्याक इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे.१६ ऑगस्टपासून शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून नवीन व नूतनीकरण विध्यार्त्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत आहे.

२०२०-२१या शैक्षणिक सत्रासाठी एनएससी पोर्टलवर बदल करण्यात आला असून शाळांनी त्यांच्या लॉगीनमधील मेनूमधून वर्गनिहाय अर्ज सादर करावे,असे आव्हान भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव सय्यद अकबर यांनी केले.

गणेश विसर्जनासंदर्भात प्रथमेश सोमण आणि 'आमचे आम्हीच 'या मित्रमंडळाचे केले पनवेलकरांनी कौतुक

दै.रायगड नगरी । पनवेल

कोरोना काळात गणेश विसर्जनासंबंधीचे कडक नियम असताना पनवेलमध्ये घरी जाऊन बाप्पा व्यवस्थित विसर्जित करण्याचा कार्यक्रम माजी शिवसेना नगरसेवक प्रथमेश चंद्रशेखर सोमण आणि आमच्या 'आमचे आम्हीच 'या मित्रमंडळाने प्रामाणिकपणे पार पाडल्याबद्दल पनवेलकरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

साधारण ७०० हुन अधिक लोकांनी त्यांना फोन केले त्यापैकी साधारण १७५ ते २०० लोकांनी त्यांचे गणपती विसर्जनासाठी दिले आणि जेव्हा गणपती त्यांना लोकं द्यायचे तेव्हाच लगेच ते पाटावर माती सुद्धा द्यायचे त्याचप्रमाणे करोनाची अतिशय गंभीर समस्या असताना होणारी गर्दी कमी केली.

प्रसंगी सर्व गणपती व्यवस्थित पद्धतीने विसर्जन केले प्रत्येकानी हँगग्लोज, मास्क सॅनिटायझर या सर्व गोष्टींची काळजी सुद्धा घेतली होती.

हा उपक्रम यशश्वी करण्यासाठी प्रसाद सोनावणे, मंदार प्रमोद काणे, अथर्व गोखले, अभिनय सोमण, केदार कोशे, श्रीरंग केतकर, कौस्तुभ सोमण, अभिषेक पटवर्धन, आर्केश कुलकर्णी, अक्षय जोशी, संदीप दादा, स्वप्नील सहस्रबुद्धे, स्वप्नील उपाध्ये, अर्जुन परदेशी या मंडळींनी विशेष परिश्रम घेतले.

श्री गणेश मित्र मंडळाचा विठ्ठल स्वरूपा गणेशोत्सवाचा देखावा

दै.रायगड नगरी । पनवेल

कोरोना महामारी संकटामुळे यंदाचा गणेशोत्सव पनवेलमध्ये साध्या पद्धतीने साजरा होत आहे. मानाचा पहिला गणपती असलेल्या पनवेल शहरातील टपाल नाका येथील प्रसिद्ध श्री गणेश मित्र मंडळाने यावर्षी अत्यंत साधेपणाने विठ्ठल स्वरूपा गणेशोत्सवाचा देखावा सादर केला आहे.

भाविकांसाठी प्रसिद्ध असलेल्या टपालीचा राजाचे यावर्षीचे ५८ वे वर्ष आहे ,मंडळाने साडूची गणेशोत्सवाची मूर्ती साकारली आहे. श्री गणेशामध्ये विठ्ठलाचे रुप साकारले आहे.सुबक, आकर्षक अशी मुर्ती आहे.मंडळाचे अध्यक्ष श्री. सुनील खळदे हे दरवर्षी सामाजिक विषय घेऊन गणेशोत्सवात देखावे सादर करत असतात. देखावा पाहण्यासाठी दरवर्षी अलोट गर्दी असते, कोरोनामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सर्व सुरक्षितता ठेवली आहे. सामाजिक विषयाचे देखावे सादर केल्याने मंडळाला वेगवेगळ्या गणेश दर्शन स्पर्धेमध्ये अनेक पारितोषिके मिळाली आहेत. मंडळातर्फे सामाजिक -शैक्षणिक- सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत.

जेएनपीटी बंदरामुळे मोठ्या प्रमाणात तस्करी

दै.रायगड नगरी । उरण

गेल्या वर्षभरात नवी मुंबई हे अंमली पदार्थ व्यापाराचे आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून समोर येत आहे. जेएनपीटी बंदरामुळे मोठ्या प्रमाणात तस्करीचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.

गेल्या वर्षभरापासून नवी मुंबईत अंमली पदार्थाचा व्यापाराने जोर धरल्याचे चित्र आहे. गांजा, चरस, अफीम, एमडी, कोकेनचा साठा जप्त होण्याचे प्रमाण वाढलं आहे. स्वातंत्रदिनाच्या पाच दिवसाअगोदर तर तब्बल १ हजार कोटीचे अफीन, हिरॉईन जप्त करण्यात आलं. आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई आहे. महत्वाचे म्हणजे कोविड काळात पोलीस इतर कारवाईमध्ये गुंतले असतांना ड्रग्स माफीया सक्रीय झाले आहेत. नवी मुंबईत शिकण्यासाठी येणारे नायजेरियन विद्यार्थी अंमली पदार्थांच्या व्यापारात सक्रीय आहेत. खारघर, तळोजा, घणसोली, पनवेल या भागात राहणार्या नायजेरीयन लोकांची संख्या अलिकडच्या काळात वाढली आहे. गेल्या वर्षभरात अंमली पदार्थाचा व्यापार करणार्या नायजेरीयन गँगमधील ३० जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

नवी मुंबईत मोठ्या प्रमाणात नायजेरीयन नागरिकांचे वास्तव्य, नायजेरीयन नागरिक ड्रग्रा तस्करीत सक्रीय, जेएनपीटी बंदराच्या माध्यमातून परदेशातून ड्रग्सची तस्करी, रस्तेमार्गे नवी मुंबईत अंमली पदार्थाचा पुरवठा, वर्षभरात गांजा, हिरॉईन, अफूच्या तस्करीत वाढ, जेएनपीटीमुळे नवी मुंबईत ड्रग्रा व्यापारी, तस्कर सक्रीय, एज्युकेशन हब असल्यामुळे तरुण ड्रग्सच्या जाळ्यात.

नवी मुंबईतील जेएनपीटी बंदर हे बाहेरील देशातून येणार्या अंमली पदार्थाच्या तस्करीचे मोठे केंद्रबिंदू ठरले आहे. जेएनपीटीमधून तस्करीमार्गे येणार्या ड्रग्सचा साठा संपूर्ण देशात दलालाच्या माध्यमातून पसरतो. त्यामुळे नवी मुंबईत मोठे ड्रग्रा माफीया सक्रीय झाले आहे. कधी काळी मुंबई ड्रग्सचे कार्टेल ठरलं होतं. नवी मुंबईची वाटचाल त्याच दिशेने सुरु असल्याचे पोलीस अधिकारी सांगंतात. त्याशिवाय रस्ते मार्गाने नवी मुंबईत अंमली पदार्थाची तस्करी केली जाते. मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेवरुन मुंबईत दिवसाला शेकडो वाहने दाखल होतात. ट्रॅव्हल्स, पीक अप वॅन, खाजगी कारच्या माध्यमातून गांजा, ड्रग्सचा साठा आणला जात असल्याचे पोलीस अधिकार्यांचे म्हणणे आहे. मुंबईनंतर नवी मुंबई हे शैक्षणिक हब आहे. व्यापाराचे केंद्र म्हणून पुढे आले आहे. मात्र शहरातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. मात्र अलिकडे वाढत असलेली अंमली पदार्थाच्या तस्करीचे रॅकेट बघता, हा नवी मुंबईच्या तरुणाईसाठी रेड सिग्नल असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे.

नव्या पिढीला व्यसनाधीन होण्यापासून वाचवण्यासाठी उपक्रम राबवण्याची गरज पोलीस अधिकार्यांनी व्यक्त केली आहे. लॉकडाऊन काळात पोलिसांनी आपली संपूर्ण ताकद लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यात लावली होती. याचा फायदा ड्रग्स माफीयांनी उचलला. त्यामुळे या काळात मोठ्या प्रमाणात ड्रग्सची तस्करी सुरु असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षभरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ व्यापाराचे हब ठरत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. आता हे रॅकेट मोडून काढण्याचे मोठे आव्हान नवी मुंबई पोलिसांपुढे आहे.

उरणमध्ये नव्याने आकारात येत असलेल्या सिडको वसाहतीतील रस्त्याची दुर्दशा

दै.रायगड नगरी । उरण

उरण परिसरातील नव्याने आकारात येत असलेल्या सिडकोच्या द्रोणागिरी नोड वसाहत येथे सेक्टर ४७ ते ५५ कडे जाणारा मार्गाच्या रस्त्याची अक्षरशः दुर्दशा झाली असून सिडकोने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी केलेले लाखो रुपये पाण्यात गेलेत की आधिकाऱ्यांच्या खिशात अशी चर्चा जनतेतून होत आहे.

सिडकोचा द्रोणागिरी नोड हा मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. सिडकोने द्रोणागिरी नोड विकसित होत असतांना येथील रस्त्यांना प्राधान्य दिले गेले आहे. बीपीसीएल मार्गाकडून नवीनशेवा गावाकडे जाणारा मुख्य रस्ता हा सेक्टर ४७, ४८, ५०, ५१ यांना जोडलेला आहे. तर त्याच मार्गाला जोडलेला रस्ता सेक्टर ५३ ते ५५ कडे जात असून, तो कोस्टल रोडला जोडलेला आहे.

या मार्गाची पावसाळ्या पूर्वीच डागडुजी करण्यात आली असून, खड्डे बुजण्याचे ही काम ठेकेदाराकडून करण्यात आले आहेत. रस्ता एक दिशा मार्ग असल्या कारणाने दोन्ही मार्गाचे खड्डे बुजण्याचे काम केले होते. परंतु सिडकोने लाखो रुपये खर्च करून खड्डे बुजलेला एक मार्ग बंद करण्यात आला आहे. ज्या एका मार्गाने वाहतूक होत आहे, त्या मार्गावर मोठं मोठे खड्डे निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मात्र या मार्गावर अपघात झाला तर याला सर्वस्वी जबाबदार सिडको प्रशासन असेल, ज्या बाजूला मोठं मोठे खड्डे पडले आहेत. त्याच्या दुसऱ्या बाजूचा रस्ता का खुला केला जात नाही असा प्रश्न ही या मार्गावरून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाशांना पडला आहे. तसेच या मार्गावरील पडलेले खड्डे त्वरीत बुजविण्यात यावे आहे. तसेच मागील केलेल्या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे. या संदर्भात सिडकोचे कार्यकारी अभियंता ए.बी. रसाळ यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

पर्यटन व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाने लवकरात लवकर परवानगी द्यावी

पर्यटन व्यावसायिकांची मागणी

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

देशामध्ये कोरोनाचे रुग्ण सापडु लागल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन व्यावसायिकांनी आपल्या हॉटेलमध्ये पर्यटक ठेवायचे नाहीत असा निर्णय लॉकडाउनच्या अगोदरच घेतला. १५ मार्च पासून श्रीवर्धन तालुक्यातील सर्व हॉटेल्स, रिसॉर्ट, लॉज पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर शासनाने लॉकडाऊन जाहीर केल्यानंतर आजच्या दिवसापर्यंत सर्व पर्यटन व्यावसायिकांची हॉटेल्स, रिसॉर्ट, लॉज पूर्णपणे बंद आहेत. श्रीवर्धन येथे अनेक कुटुंबांचा संसार पर्यटन व्यवसायावर चालतो. श्रीवर्धन मधील पर्यटन व्यवसाय सुरू असल्या नंतर या व्यवसायाशी अनेक निगडित घटकांना देखील चांगल्या प्रमाणात रोजगार मिळतो. अनेक महिला मोठ्या हॉटेल्समध्ये किंवा लॉजमध्ये तांदुळाच्या भाकर्या किंवा चपात्या करून देत असतात. पर्यटक जास्त प्रमाणात श्रीवर्धन मध्ये आले की मासळी विकणार्यांचा धंदाही तेजीत असतो. त्याचबरोबर तीन चाकी रिक्षा खाजगी वाहने यांनादेखील पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणावरती धंदा मिळतो.

श्रीवर्धन तालुक्यात अनेक नागरिक महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या निवास व न्याहारी योजनेअंतर्गत घरच्या घरीच पर्यटकांची राहण्याची सोय तसेच नाष्टा व भोजनाची सोय करत असतात. अनेक पर्यटन व्यावसायिकांनी बँकांकडून कर्ज घेऊन आपली हॉटेल्स किंवा रिसॉर्ट उभी केली आहेत. मागील सहा महिन्यांपासून सर्वांचे धंदे पूर्णपणे ठप्प आहेत. काहीजणां वरती अक्षरश: उपासमारीची वेळ आलेली आहे. पर्यटन व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाने एक नियमावली तयार करून त्यानुसार पर्यटन व्यवसाय सुरू करण्यासाठी लवकरात लवकर परवानगी द्यावी, अशी मागणी पर्यटन व्यवसायिकांमधून तसेच पर्यटन व्यवसायाशी निगडित असलेल्या घटकांकडून करण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील अँटीजेन चाचण्या थांबल्या ; किट उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणात अडचणी

शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांचे आयुक्तांना पत्र

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात अँटीजेन चाचण्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे काही मिनिटात कोरोना लक्षण आहेत की नाही. हे समजून येत असल्याने कोरोना नियंत्रणासाठी ही चाचणी उपयुक्त ठरत आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून याकरता लागणाऱ्या किट उपलब्ध नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अँटीजेन चाचण्या होत नाहीत. दरम्यान या किट त्वरित उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनी मनपा आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे केली आहे. त्यांनी त्याबाबत सोमवारी प्रशासनाला निवेदन दिलेले आहे.



वाऱ्याच्या वेगाने कोरोना बाधितांच्या संख्येत वाढ होतेय. त्यामुळे सर्वाधिक रुग्ण आढळेल्या विभागात अँटीजेन टेस्ट करण्यात येतंय. या चाचणीसाठी रुग्णाच्या रक्ताचे नमुने घेतले जातात. या रक्ताच्या नमुन्यातून १५ ते २० मिनिटांत शरीरात कोणते विषाणू आहेत याचा तपास लागतो. लक्षणं नसलेल्या लोकांसाठी रॅपिड टेस्टिंग वरदान ठरतंय. रुग्णाच्या शरीरात ॲन्टिबॉडी कार्यरत नसेल तर त्या व्यक्तीला कोरोनाची लागण होण्याची शक्यता असते. रॅपिड अँटीजेन ही कोरोना चाचणीला पर्याय असल्याने गेल्या काही दिवसांमध्ये मनपा हद्दीतील आरोग्य केंद्रांमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आपल्या चाचण्या करून घेतल्या. त्यामुळे कोरोना संसर्ग झालेल्या रुग्ण डिटेक्ट होवून त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले. यामुळे कोरोनाविषाणू चे संक्रमण नियंत्रणात आणण्यात सुद्धा बऱ्यापैकी यश मिळाले.

स्वॅब घेतल्यानंतर कोरोना अहवाल प्राप्त होण्यास दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागतो. दरम्यान पनवेल महानगरपालिकेने सर्व आरोग्य केंद्रात अँटीजेन चाचणीस सुरूवात केले. दिवसभरात अनेकांची चाचणी केली जात होती. परिणामी यामुळे कोरोनाची लक्षणे असलेले रुग्ण डिटेक्ट होतात . कोरोना विषाणूंचे संक्रमण थांबवण्यासाठी ही पद्धत अधिक सोपस्कर असल्याचे दिसून आले. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रावर अँटीजेन टेस्टिंग किट उपलब्ध नाहीत. परिणामी टेस्ट करण्याचे काम थांबले आहे. यामुळे कोरोना नियंत्रण आणि संक्रमण थांबवण्याचा दृष्टिकोनातून अडचणी येऊ लागल्या आहेत. पनवेल महानगरपालिकेने त्वरित,अँटीजेन टेस्टिंग किट उपलब्ध करून नागरिकांच्या जास्तीत जास्त चाचण्या कराव्यात अशी मागणी शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी केली आहे. लवकरच या किट तपासणी केंद्रांना दिल्या जातील असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सु.ए.सो चा आडमुठेपणा ; जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली

इयत्ता ११ वीच्या ज्यादा प्रवेश शुल्काबाबत आमरण उपोषण

दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी

इयत्ता ११वीच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून विद्यार्थ्यांकडून ११वीच्या विज्ञान, वाणिज्य व कला प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांकडून ग.बा वडेर हायस्कुल व व.ग.ओसवाल ज्यूनियर कॉलेज पाली यांच्याकडून अव्वा च्या सव्वा प्रवेश शुल्क आकारला जात आहे.त्याबाबत बहुजन विद्यार्थी संघटना व सम्यक विद्यार्थी आंदोलन मार्फत बुधवारी(दि.२६)सकाळी ११:३० वाजता ग.बा.वडेर च्या गेट च्या बाहेर आमरण उपोषणास बसणार आहेत.

सध्या संबंध देशात कोरोना सारख्या महामारीने जनता होरपळून निघाली आहे. कोणाच्याही हाताला काम नाही.विद्यार्थांना शिकविण्यासाठी पालक वर्गाकडे पैसे नसून सुद्धा सु.ए.सो सारख्या मुजोर संस्था प्रवेश प्रक्रियेसाठी १०ते १५ हजार प्रमाणे अव्वा च्या सव्वा शुल्क पालक वर्गाकडून वसूल करीत आहे. यासंदर्भात बहुजन विद्यार्थी संघटना व सम्यक विद्यार्थी आंदोलन यांनी विद्यार्थ्यांकडून शासनाच्या नियमाप्रमाणे प्रवेश शुल्क घ्यावा असे निवेदन दिले. रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडून सुद्धा तसे पत्रक सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी व ग.बा. वडेर हायस्कुल ला दिले असून जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाला सु.ए.सो च्या ग.बा. वडेर व व.ग.ओसवाल ज्युनियर कॉलेज पाली यांनी केराची टोपली दाखवली आहे.

इयत्ता ११वीच्या प्रवेश शुल्कात कोरोनामुळे सवलत मिळावी याकरिता चर्चा करण्यासाठी गेले असता रवींद्र घोसाळकर यांनी संस्थेने ठरविल्याप्रमाणे आम्ही आकारलेली फी घेणारच असे उद्धट उत्तर दिले.त्यामुळे विद्यार्थी संघटनेकडून विद्यार्थाना न्याय मिळवून देण्यासाठी आमरण उपोषण पत्करले आहे.

कोरोनामुळे अनुसूचित जाती व जमाती च्या तसेच सरसकट सर्वच विद्यार्थांना मोफत प्रवेश मिळावा तसेच विना अनुदानित तुकडितील विद्यार्थ्यांना परवडेल असा मासिक शुल्क आकारावा अशा प्रकारच्या मागण्या घेऊन विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी आमरण उपोषणास बसत आहेत. याबाबतचे निवेदन सुधागडचे तहसीलदार दिलीप रायन्नावर यांना देण्यात आले. यावेळी ब.वि.स चे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष अमित गायकवाड, जिल्हाउपाध्यक्ष निशांत पवार, तालुकाध्यक्ष सुशील गायकवाड, सचिव सिद्धांत गायकवाड, रोहित गायकवाड व सम्यक विद्यार्थी आंदोलन चे सुधागड अध्यक्ष स्वप्नील गायकवाड व पदाधिकारी उपस्थित होते.

उरणमध्ये काल कोरोनाचे नवे ११ रुग्ण तर दोघांचा मृत्यू

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात कोरोनाचे नवे ११ रुग्ण आढळून आले असून, दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना झाली आहे.तर १५ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत.

यामध्ये तालुक्यातील विंधणे –१, नवघर –१, एन ए डी करंजा –१, वारीक आळी नागाव –२, भेंडखळ –२, बोरी –२, कोटनाका –१ व मोरा – १ असे ११ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत.

तर दोघांचा कोरोना संसर्गाने उपचार घेत असतांना भेंडखळ व नागाव येथील रुग्णांचा मृत्यू झाला आहे. करंजा –२, बापूशेठ वाडी उरण –१, खोपटे, धसाखोशी – १, भेंडखळ –३, सोनारी –१, आवरे –१, जेएनपीटी सीआयएसएफ कॉलिनी –१, डोंगरी –१, करंजा, नवापाडा –१, गणेश सोसायटी नागाव –१, मुळेखंड, तेलिपाडा –१, नागाव –१ व मांगीरा झोपडपट्टी भवरा –१ असे एकूण १५ कोरोनाग्रस्त रुग्ण रुग्णालयातून उपचार घेऊन बरे होऊन सुखरुप घरी परतले आहेत.

तर उरण तालुक्यातील २३८५ नागरिकांची आत्तापर्यंत कोरोना चाचणी करण्यात आली आहे.

जड-अवजड वाहने चोरणारी सराईत चौकडी गजाआड

पंधरा दिवसात तीन वाहने चोरल्याचे उघड

दै.रायगड नगरी । पनवेल

रस्त्याच्या बाजुला उभे असलेले ट्रक, ट्रेलर व डंपर चोरणाऱ्या सराईत चौकडीला पकडून त्यांनी चोरुन नेलेला दहा चाकी हायवा ट्रक हस्तगत करण्यात एनआरआय पोलिसांना यश आले आहे.

प्रताप लोमटे (४१), संजय अपुने (४१), रोशन कांबळे (२४) आणि दत्ता कांबळे (२५) अशी या चोरट्यांची नावे असून या चोरट्यानी न्हावा–शेवा व पनवेल भागातून देखील दोन ट्रेलर चोरुन नेल्याचे व त्यांची भंगारात विल्हेवाट लावल्याचे उघडकिस आले आहे. विशेष म्हणजे हे आरोपी कोरोनामुळे गत महिन्यामध्ये तात्पुरता जामीन मिळवून कारागृहातून बाहेर आले होते. त्यानंतर काही दिवसांतच त्यांनी पुन्हा वाहन चोरी करण्यास सुरुवात केल्याचे तपासात आढळुन आले आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीपैकी प्रताप लोमटे, संजय अपुने व दत्ता कांबळे हे तिघेही ड्रायव्हर असुन त्यांना चावी शिवाय वाहन चालु कशी करायची याची चांगली माहिती आहे. त्यामुळे हे तिघेही रोशन कांबळे याच्या रिक्षातून पहाटेच्या सुमारास वाहन चोरी करण्यासाठी बाहेर पडायचे त्यानंतर ते रस्त्याच्या बाजुला उभे असलेले ट्रक,ट्रेलर व डंपर चावी शिवाय सुरु करुन ते वाहन प्रताप लोमटे व दत्ता कांबळे हे पुण्यात विक्रिसाठी घेऊन जायचे. अशाच पद्धतीने या चौकडीने गत आठवडयात उलवे परिसरातुन दहा चाकी हायवा ट्रक चोरुन नेला होता.

याबाबत एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर एनआरआय पोलिसांनी या वाहन चोरी प्रकरणाचा तपास सुरु केला होता. या गुह्याच्या तपासादरम्यान, उलवे येथून चोरुन नेलेला हायवा ट्रक पुण्यात विक्री करण्यासाठी नेण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर चास्कर, अजित झांजुर्णे व त्यांच्या पथकाने पुण्यात जाऊन ट्रक विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या प्रताप लोमटे व संजय अपुने या दोघांना अटक केली. तसेच त्यांनी चोरलेला हायवा ट्रक ताब्यात घेतला. त्यांनतर पोलिसांनी या दोघांकडून अधिक माहिती घेऊन या गुह्यात सहभागी असलेले त्यांचे साथिदार रोशन कांबळे व दत्ता कांबळे या दोघांना जुईनगर येथून अटक केली. या चौघांनी पंधरा दिवसापुर्वी न्हावा–शेवा व पनवेल भागातून दोन ट्रेलर चोरल्याचे तसेच दोन्ही ट्रेलरची न्हावा–शेवा येथील भंगारात विल्हेवाट लावल्याचे तपासात आढळुन आले आहे. त्यानुसार पोलिसांनी न्हावा–शेवा भागातील अक्रम शहा या भंगारवाल्याला देखील अटक केली आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेले सराईत चोरटे प्रताप,संजय, दत्ता आणि रोशन यांच्यावर यापुर्वी देखील वाहन चोरीचे ५ ते ६ गुन्हे दाखल असून ते याच गुह्यात कारागृहात बंदिस्त होते. मात्र कोरोनामुळे न्यायालयाने गत महिन्यामध्ये या चौघांना तात्पुरता जामिन देऊन त्यांची कारागृहातुन सुटका केली होती. कारागृहातून बाहेर आल्यानंतर या चोरट्यानी पुन्हा गत पंधरा दिवसांमध्ये ३ अवजड वाहने चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या आरोपींपैकी तिघांना कोरोनाची लागण झाली असून एका आरोपीला वाशी येथील रुग्णालयात तर इतर दोघांना इंडिया बुल्स येथे कॉरंटाईन सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. तर त्यांच्या चौथ्या साथिदाराची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

विभागीय तृतियपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळावर उप आयुक्त (नियोजन) यांचे नामनिर्देशन

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

नियोजन विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील वरिष्ठ अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त कार्यालय येथे कार्यरत असलेले उप आयुक्त (नियोजन) यांचे विभागीय तृतियपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळावर दि. २५ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नामनिर्देशन करण्यात आले आहे.

राज्यातील तृतीयपंथींच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या समस्या व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे, तसेच त्यांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने विभागीय स्तरावर विभागीय तृतीयपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचा शासन निर्णय क्रमांक तृतीय २०१८/ प्र.क्र. २६/ सामासू, दि. १२ डिसेंबर २०१८ नुसार विभागीय तृतियपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाच्या संरचनेनुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (नियोजन) या पदावर कार्यरत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नामनिर्देशन करण्यात आले आहे.